**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :-

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १३६७/ सोलापूर | श्री. ज्ञानदेव बाबुराव रुपनवर मु.पो.कुरबावी, ता.माळशिरस, जि. सोलापूर | मुख्याध्यापक माध्यमिक विद्यालय, कुरवली, ता. इंदापूर, जि. पुणे | सचिव/ अध्यक्ष श्री. शिवाजी एज्युकेशन सोसायटी, बावडा, ता. इंदापूर, जि. पुणे | सन २००३ ते २००७ पर्यंतची सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेतून मागास वर्गीय मुलांना देण्यात आलेल्या शिष्य - वृत्तीची वर्गवार व वर्षनिहाय माहिती मागासवर्गीय गुणवत्ता मुलामुलींना पहिल्या दोन क्रमांकासाठी देण्यात आलेल्या शिष्यवृत्तीची वर्गवार व वर्ष निहाय माहिती, सन २००३ ते २००८ पर्यंत वरील शिष्यवृत्तीसाठी पाठविलेल्या प्रस्तांवाच्या प्रती. | आवश्यक माहिती मिळाल्याने अपीलकर्त्याने दि. १६.०४.०९ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा 'तील प्रपत्रात नमूद केले आहे. |
| २ | १३९७/ सोलापूर | श्री जयवंत दशरथ जगताप मु. पो. सोहाळे, ता. मोहोळ जि. सोलापूर | सहायक संचालक (अ.तां.), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, पुणे - ५ | सहायक संचालक (तां.), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, पुणे - ५ | आरेखक यांत्रिकी पदाच्या परीक्षेसाठी ओळखपत्र मिळाले नाही, निकाल उशिरा लावण्याची कारणे, उत्तर पत्रिका सूची व उत्तर पत्रिका, प्रात्यक्षिक परीक्षा व मुलाखत यादी यांचे गुण याबाबतची माहिती. | यापूर्वी माहिती, जशी आहे तशी उत्तरसूची विना-स्वाक्षरी देण्यात आली,असे अपिलीय प्राधिकारी यांनी दि.१६.०४.०९ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | १४०५/ सोलापूर | श्री धनाजी दिनकर रूपनवर मु.डोंबाळवाडी (कुरबावी), पो.शिंदेवाडी ता.माळशिरस, जि. सोलापूर | मुख्याध्यापक, श्रीराम खोलेश्वर हायस्कूल, मुंजवडी, ता.फलटण, जि. सातारा | शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, सातारा | सन १९९२पासूनची शिक्षकांचा हजेरी पत्रक छायाप्रत, शिक्षक हजेरी पत्रकातून वगळलेल्या शिक्षकांची कारणांसह माहिती, वार्षिक तपासणी अहवाल, शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी पेड पगार तक्ता, व शिक्षक ज्येष्ठता यादी, व इतर एकूण ५ मुद्दयांची माहिती. | २/३ मुद्दे वगळता उर्वरित माहिती मिळाली तक्रार नसल्याचे अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी दि. १६.०४.२००९ चा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले आहे .ऊर्वरीत मुद्दयांची माहिती आठ दिवसांत अपीलकर्त्यास द्यावी, पूर्तता अहवाल दि. २५.७.०९ पर्यंत आयोगास सादर करावा. |
| ४ | १४२९/ सोलापूर | श्री.दत्तात्रय विठ्ठलराव पोसा १७१३, दत्तनगर, जि.सोलापूर | जिल्हा व्यवस्थापक, आण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ, सोलापूर, जिल्हा कार्यालय, सोलापूर | मुख्य लेखा व वित्त अधिकारी, आण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ, मुंबई - २३ | आण्णासाहेब पाटील महामंडळाच्या थेट कर्ज योजना व बीज भांडवल योजनांतर्गत कर्ज वाटप केलेल्या लाभार्थ्यांची नावे व पत्यांसह यादी. | आवश्यक माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने दि. १६.०४.२००९ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ५ | १४३१/ सोलापूर | श्री.दत्तात्रय विठ्ठलराव पोसा १७१३, दत्तनगर, जि.सोलापूर | नोडल अधिकारी, मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळ सोलापूर, जिल्हा कार्यालय, सोलापूर | व्यवस्थापकिय संचालक, मौलाना आझाद आर्थिक विस्तार महामंडळ, मुंबई -२३ | सन १९९५ ते २००८ पर्यंत उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर व अक्कलकोट या तालुक्यातील ज्या लाभार्थ्यांना कर्ज मंजूर केले त्यांची यादी, कर्ज दिल्याची तारीख, कर्ज परतफेड भरलेली रक्कम तारखेसह, थकीत कर्ज, वसुलीची कारवाई नवीन कर्ज मागणी केलेल्या लाभार्थ्यांची यादी. | काही माहिती 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'-च्या दिवशी मिळाली. ऊर्वरित माहिती कार्यालयात देणार असल्याने अपील निकाली काढण्याची विनंती अपीलकर्त्याने दि. १६.०४.२००९ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात केली आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ६ | १४३५/ सोलापूर | श्री.जयवंत भागवत लुंगसे मु पो. लव्हू, ता.माढा, जि.सोलापूर | गट - शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, कुर्डुवाडी, ता.माढा, जि. सोलापूर | गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कुर्डुवाडी, ता.माढा, जि. सोलापूर | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लव्हू शौचालयाचे बांधकाम मंजूर रक्कम, सबंधित, अधिका-याच्या पुस्तकाची झेरॉक्स प्रत, काम पूर्व जमाखर्च रक्कम, चेक नंबरसह माहिती. | आवश्यक ती माहिती प्राप्त झाल्याचे अपिलकर्त्याने दि. १६.०४.०९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात ~~केली आहे. प्रपत्रात~~ नमूद केले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

१) वरील तक्त्यातील अनुक्रमांक १ ते ६ अपिले ( अपील क्र १३६७, १३९७, १४०५, १४२९, १४३१, व १४३५/सोलापूर) निकाली काढण्यात येत आहेत.

२) अपील क्र. १४०५, १४३१ व १३९७ मध्ये विशिष्ट मुदतीत माहिती देण्याबाबत उभयतांमध्ये एकमत झाले आहे, त्यानूसार पूर्तता करून जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दि.२५.०७.०९ पर्यंत अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा, अन्यथा सबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम २० अन्वये शास्ती व तदनुषंगिक अन्य कारवाईस पात्र राहतील.

**पुणे**
**दि.१५ .०७.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. सईद अब्दुल कादर रहेमतुल्ला,
मिका मस्जिद व मुबारक क्लिनिकजवळ,
स.नं.५२, कोंढवा खुर्द, पुणे-४८ — अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्राचार्य,
पूना कॉलेज, कॅम्प, पुणे-१ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा चेअरमन,
अेकेआय ट्रस्ट, बैतुल अमन हौ.सो.२ रा मजला,
मौलाना आझाद रोड, नागपाडा, मुंबई

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४११ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १३.१०.२००८ |

३. उपस्थित

**अपीलकर्ता** श्री. सईद अब्दुल कादर रहेमतुल्ला,
मिका मस्जिद व मुबारक क्लिनिकजवळ,
स.नं.५२, कोंढवा खुर्द, पुणे-४८

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्राचार्य, पूना कॉलेज, कॅम्प, पुणे-१
डॉ. महमद कुद्रतुल्ला

<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>

पूना कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स, कॅम्प, पुणे येथील उप प्राचार्यांच्या कामाच्या व वर्कलोड संदर्भात माहिती, सन २००१ ते २००७ मध्ये एफवाय, एसवाय व टीवाय. बीएसस्सी मध्ये झुऑलॉजी हा विषय घेतलेल्या विद्यार्थ्यांची सख्या, झुऑलॉजी डिपार्टमेंटमधील स्टाफच्या कामाच्या वाटपाची माहिती, युनिव्हर्सिटीच्या रुलप्रमाणे एक आठवड्यात एकूण किती तास एचओडीची अपेक्षा असते व इतर अनुषंगिक माहिती

## विवेचन

अपीलकर्ता श्री. सईद अब्दुल कादर रहेमतुल्ला यांनी पूना कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स, कॅम्प, पुणे येथील उप प्राचार्यांचे काम, विद्यार्थ्यांची संख्या, आदी माहिती चेअरमन, अेकेआय ट्रस्ट, बैतुल अमन हौ. सोसायटी, नागपाडा, मुंबई यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या पातळीवर वारंवार अर्ज करूनही कोणतीही माहिती मिळाली नाही, म्हणून श्री. रहेमतुल्ला यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

सन २००७ पासून माहिती मागणारे ५-६ अर्ज आपण केले, परंतु कोणत्याही अर्जाचे उत्तर दिले गेले नाही. संस्थेने अनेक प्रकरणांमध्ये शासनाची फसवणूक केली आहे, ते उघडकीस येऊ नये म्हणून आपल्याला माहिती दिली जात नाही, असे प्रतिपादन श्री. रहेमतुल्ला यांनी आयोगापुढील सुनावणीत केले.

अपीलकर्तो श्री. रहेमतुल्ला हे संस्थेच्या सेवेत होते. त्यांनी मागितलेल्या माहितीतील काही विषयाबाबत पोलीस चौकशी चालू असल्यामुळे संबंधित कागदपत्र पोलीसांकडे देण्यात आली आहेत. तसेच वारंवार माहिती मागवून वेगवेगळे प्रश्न उपस्थित करून श्री. रहेमतुल्ला जाणून बुजून संस्थेला त्रास देत आहेत. त्यांनी संस्थेबाबत वेगवेगळ्या ठिकाणी अर्ज केले आहेत. या अपिलाच्या संदर्भात त्यांनी नमूद केलेला अर्ज संस्थेकडे आलेला नाही, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा प्राचार्य, पूना कॉलेज, कॅम्प, पुणे डॉ. महमद कुद्रतुल्ला यांनी केले. आयोगाने विचारणा केली असता, माहितीची मागणी करणारा अर्ज जन माहिती अधिकाऱ्यांकडे सादर केल्याचा व पोहोचल्याचा पुरावा अपीलकर्ता देऊ शकले नाहीत.

श्री. रहेमतुल्ला यांच्या अपिलाची सुनावणी मे २००८ मध्ये ठेवण्यात आली होती, त्यावेळी लेखी निवेदन देण्यास प्राचार्यांनी अनुमती मागितली होती. आयोगाने ती दिल्यानंतरही असे निवेदन प्राचार्य डॉ. कुद्रतुल्ला यांनी सादर केले नाही. मात्र मुदतवाढीची मागणी केली. आयोगाने ती अमान्य केली व पोलिसांकडे चौकशीसाठी दाखल केलेल्या कागदपत्रांव्यतिरिक्तची माहिती त्वरित व निःशुल्क देण्याचे मौखिक आदेश आयोगाने दिले.

आपण मागितलेली माहिती सह संचालक, उच्च शिक्षण विभाग, पुणे यांच्याकडून आपल्याला प्राप्त झाल्यामुळे आपली तक्रार राहिलेली नाही, असे श्री. रहेमतुल्ला यांनी दि. १३.५.२००९ रोजी दिलेले लेखी निवेदन प्राचार्यांनी सादर केले असून आयोगाला ते दि. २६.९.२००९ रोजी प्राप्त झाले आहे. अपीलकर्त्यांची माहिती देण्याबाबतची तक्रार राहिलेली नसल्याचे त्यात स्पष्टपणे नमूद करण्यात आले असल्यामुळे आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १० .७.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे :

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १४३२/ पुणे | श्री.विकास भिमराव गायकवाड मु.पो.वडापुरी, ता.इंदापूर, जि. पुणे | विस्तार अधिकारी, पंचायत समिती इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे | गट विकास अधिकारी, पंचायत समिती इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे | सन २००६ ते जुलै २००७ या कालावधी मध्ये इंदापूर, बावडा, वालचंदनगर व भिगवण येथे घेण्यात आलेल्या संनियंत्रण पाणी पुरवठा ट्रेनिंग मधील प्रशिक्षणार्थींची नावे, प्रशिक्षणाचा कालावधी, ठिकाण व खर्च इ.माहिती | आवश्यक माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने दि.२१.१०.०८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले आहे. |
| २ | १४३३/ पुणे | श्री.विकास भिमराव गायकवाड मु.पो.वडापुरी, ता.इंदापूर, जि. पुणे | सहाय्यक प्रकल्प अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, पुणे, यशवंतराव चव्हाण भवन, ४३६, सोमवार पेठ, पुणे -१ | प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, पुणे, यशवंतराव चव्हाण भवन, ४३६, सोमवार पेठ, पुणे -१ | श्री साई सेवा संस्था व इतर संस्थांनी केलेल्या कामाची माहिती, कामाचे मूल्यांकन, कामाच्या मंजुरीच्या तसेच मस्टरच्या छायांकित प्रती इ. माहिती | आवश्यक माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने दि.२१.१०.०८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | १४३७/ पुणे | श्री.विकास भिमराव गायकवाड मु.पो.वडापुरी, ता.इंदापूर, जि. पुणे | शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग, पंचायत समिती इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे | गट विकास अधिकारी, पंचायत समिती इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे | सन २००५-२००७ या कालावधीत सर्व शिक्षण अभियान राबवताना वापरण्यात येणाऱ्या गाडीच्या लॉगबुकच्या छायांकित प्रती, कोणत्या शाळांना भेटी देण्यात आल्या याची माहिती व प्रवासभत्ता बिलाच्या छायांकित प्रती | आवश्यक माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने दि.२१.१०.०८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ४ | १५६६/ पुणे | श्री.सुनिलकुमार बावधनकर चोपडे एजन्सीज ॲण्ड कन्सल्टीज, हिरामण लांडे बिल्डिंग, कासारवाडी, पुणे - ३४ | प्रमुख लिपिक, जिल्हाधिकारी कार्यालय सातारा, जि.सातारा | निवासी उप जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय सातारा, जि.सातारा | सौ.लिलाबाई म. माने यांच्या दि.०८.०९.०६ रोजीच्या अर्जाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीची लेखी स्वरुपात माहिती व मांढरादेवी दुर्घटनेत शासनाकडून मिळालेले अनुदान व वितरणाबाबतची माहिती | आवश्यक माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने दि.२१.१०.०८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'मधील नमूद केले आहे. |
| ५ | २२२०/ पुणे | सौ. संजिवनी मनोहर पवार सी-२८, मनमोहन पार्क, बिबवेवाडी, पुणे -३७ | उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., शहर विभाग, कोल्हापूर | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., शहर विभाग, कोल्हापूर | श्री.महेश दगडू गवळी हे तार टाकून वीज चोरी करीत असल्याबाबत दि.२१.०८.०७ रोजी तक्रार अर्ज दिलेला होता. या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने करण्यात | दि.२३.१२.०८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केल्याप्रमाणे अपीलकर्त्यास दि.३०.१२.०८ रोजी माहिती दिल्याचे जन |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | आलेल्या कार्यवाहीच्या फाईलची छायांकित प्रत | माहिती अधिकारी यांनी कळविले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

वरील तक्त्यातील अपिले अनुक्रमांक १ ते ५ (अपील क्र. १४३२, १४३३, १४३७, १५६६ व २२२०/पुणे ) निकाली काढण्यात येत आहेत.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २८-०७-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

प्रति

श्री महेश भिमराव जाधव
१६, सहयोग नगर, जलशुध्दीकरण केंद्राजवळ,
पंढरपुर जि. सोलापूर — अपीलकर्ता

विरूध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
समाजकल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, सोलापूर — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
कार्यालयीन अधीक्षक,
समाज कल्याण अधिकारी कार्यालय,
जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४७०/ सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१२.११.२००८ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.०१.१२.२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२०.१२.२००९ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.---- |
| ६ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती<br>दि १५.१२.०७ व ०१.०२.०८ रोजी पलसी सुपली, उपरी येथील मागासवर्गीय मुला/ मुलींच्या वसतीगृह भेटीचा अहवाल व कर्मचा-यां बाबतची माहिती. | |

## विवेचन

अपीलकर्ते श्री. महेश भिमराव जाधव यांनी जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, समाजकल्याण अधिकारी कार्यालय, सोलापूर यांच्याकडे मागितलेली माहिती न मिळाल्याने राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. माहिती तयार असून घेऊन जावी, असे जन माहिती

अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक समाजकल्याण अधिकारी कार्यालय, सोलापूर यांनी कळविले. योग्य माहिती न मिळाल्याचे अपीलकर्त्यास वाटत असल्यास, अपीलकर्त्यास अभिलेख अवलोकन करता येईल.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, समाजकल्याण अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद सोलापूर यांनी अभिलेख अवलोकन करू द्यावे व मूळ अर्जानुसार हवी असलेली माहिती द्यावी. या बाबतचा पूर्तता अहवाल दिनांक ३०.०७.२००९ पर्यंत आयोगाला सादर करावा.

३) प्रथम अपिलाबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर यांनी दिनांक ३०.०८.२००९ पर्यंत आयोगास सादर करावा

४) उपरोक्त २ व ३ नुसार पूर्तता न झाल्यास सबंधित अधिकारी शास्ती व तद्नुषंगिक कारवाईस पात्र राहतील.

**पुणे**
**दि. ३०.०७.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

कु. हेमलता आप्पाराव उपासे
c/o नकाते एम. एस., खंडोबा गल्ली,
मंगळवेढा, जि. सोलापूर

**अपीलकर्ता**

अपिलीय प्राधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्य.),
जिल्हा परिषद सोलापूर

**उत्तरवादी**

जन माहिती अधिकारी तथा
उप शिक्षणाधिकारी (माध्य.),
जिल्हा परिषद सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४८६ / सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२०.०१.२००८ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. --- |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१.०२.२००९ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. --- |
| ६ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती<br>मुख्याध्यापक, नूतन मराठी माध्यमिक विद्यालय, मंगळवेढा यांनी जून २००६ ते एप्रिल २००७ पर्यंत कार्यरत शिक्षक शिक्षकेतर कर्मचा-यांचे नियुक्ती आदेश देताना वैयक्तिक मान्यता घेतली आहे काय, असल्यास त्याच्या सत्य प्रती. सदर कार्यरत कर्मचा-यांना संस्थेने नियुक्ती आदेश देऊन आपल्या कार्यालयाकडून वैयक्तिक मान्यता घेतली आहे काय, असल्यास सत्य प्रती तात्काळ मिळाव्यात, नसल्यास नियुक्ती आदेश व मान्यता न घेता लाभ करून घेणे म्हणजे कर्मचा-यांची फसवणूक नाही काय, नियुक्ती आदेश वैयक्तिक मान्यता न घेतल्याबद्दल आपल्या कार्यालयाने त्या संस्थेवरती कोणती प्रशासकीय कारवाई केली, याचा लेखी अहवाल **द्या**वा, कारवाई केली नसल्यास का केली नाही याचा लेखी खुलासा करावा. | |

## विवेचन

अपीलकर्त्या श्रीमती हेमलता आप्पाराव उपासे यांनी मुख्याध्यापक, नूतन मराठी माध्यमिक विद्यालय, मंगळवेढा यांच्या कामकाजासंबंधात जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडे मागितली होती. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिले नाही. खुलासा, कारवाईची मागणी हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. मात्र जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्य.), यांनी उत्तर न देणे योग्य नाही. माहिती-मागणीतील नियुक्ती आदेशांबाबतची वस्तुस्थिती त्यांनी अपीलकर्त्यास कळविणे आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्य.), सोलापूर यांनी उक्त आदेश प्राप्त झाल्यापासून आठ दिवसांत अपीलकर्त्यास माहिती मागणीतील नियुक्ती आदेशाबाबतची वस्तुस्थिती कळवावी व त्याचा पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा, अन्यथा सबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० अन्वये शास्ती व तद्नुषंगिक अन्य कारवाईस पात्र राहतील.

**पुणे**
**दि.३० .०७.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

प्रति

श्रीमती सुमन अनंत पुरंदरे
'मनिषा', ३ /९ समर्थ नगर,
उत्तर सदर बझार, सोलापूर

**अपीलकर्ता**

अपिलीय प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबधक, सहकारी संस्था, सातारा
नवीन प्रशासकीय इमारत, एस. टी. स्टॅडजवळ, सातारा

**उत्तरवादी**

१) जन माहिती अधिकारी तथा
सहायक निबंधक सहकारी संस्था,
ता. माण (दहिवडी), जि. सातारा

२) चेअरमन,
श्रीराम दर्शन महिला ग्रामीण बिगर शेती सहकारी
पतसंस्था,मर्या., गोंदवले (बु.), ता. माण, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४९३ / सोलापूर / अ |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२९.१२.२००८ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०९.०१.२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १७.०२.२००९ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १९.०३.२००९ |
| ६ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती<br>श्रीराम दर्शन महिला ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्यादित, गोंदवले (बु.) चा सन २००६ -०७ व २००७ -०८ चा लेखापरीक्षण अहवाल, नफातोटा पत्रक, ताळेबंद, कर्ज वसुली, थकित कर्जदार नावे व इतर मुद्दयांची माहिती. | |

## विवेचन

अपीलकर्त्या श्रीमती सुमन अनंत पुरंदरे यांनी श्रीराम दर्शन महिला ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेच्या सन २००६- ०७ व २००७ - ०८ या वर्षाच्या लेखा परीक्षण अहवालासह अन्य ७ मुद्दयांची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नसल्याने माहिती देता येत नसल्याचे संस्थेच्या व्यवस्थापकांनी कळविले. अपीलकर्त्या श्रीमती पुरंदरे या सबंधित संस्थेच्या सभासद असल्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० नियम ३० नुसार आवश्यक असणारी माहिती पुरविणे संस्थेस बंधनकारक आहे. त्याप्रमाणे अर्जदार यांनी संपर्क साधावा व आवश्यक ते शुल्क भरून माहिती उपलब्ध करुन घ्यावी, असे नमूद करून अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सातारा यांनी अपील निकाली काढले. त्याविरूध्द श्रीमती पुरंदरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा नागरी सहकारी बँका / पतसंस्था यांना लागू नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटिशन ५६६६/२००७ मध्ये दिलेला आहे. सदरबाब विचारात घेता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) नियंत्रक अधिकारी म्हणून सहकारी संस्थांची जी माहिती सहकार खात्याच्या सबंधित कार्यालयांकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे, ती त्या त्या कार्यालयांनी अर्जदारांना देणे बंधनकारक आहे. त्यानुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे.

पुणे
दि.२२.०७.२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्रीमती मीरा नागनाथ चौधरी
मु. पो. कळंब, अक्षय हॉटेलच्या पाठीमागे,
परळी रोड, कळंब, ता कळंब, जि. उस्मानाबाद

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
समाज कल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, सोलापूर

**उत्तरवादी**

जन माहिती अधिकारी,
समाजकल्याण अधिकारी कार्यालय,
सोलापूर जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४९६ / सोलापूर / अ |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.०३.११.२००८ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. --- |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. --- |
| ५ | अपिलीय प्रधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. --- |
| ६ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती<br>भविष्य निर्वाह निधीची रक्कम वेतनातून कपात का होत नाही याबाबतच्या तक्रारीवरील कार्यवाहीबाबतची माहिती. | |

**विवेचन**

अपीलकर्त्या श्रीमती मीरा नागनाथ चौधरी यांनी भविष्य निर्वाह निधीची रक्कम वेतनातून कपात का होत नाही, याबाबतच्या त्यांच्या तक्रारीवरील कार्यवाहीची माहिती जन माहिती अधिकारी, समाजकल्याण अधिकारी कार्यालय, सोलापूर यांच्याकडे मागितली होती.

संबंधित माहिती मुख्याध्यापक, मतिमंद शाळा, कळंब, जि. उस्मानाबाद यांच्याकडून घ्यावी, त्यांना तशा सूचना देण्यात आल्या आहेत, असे जन माहिती अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी यांनी अपीलकर्त्या श्रीमती चौधरी यांना कळविले, त्यानुसार मुख्याध्यापक मतिमंद शाळा, कळंब यांनी माहिती दिली नाही, म्हणूण श्रीमती मीरा चौधरी यांनी (प्रथम अपील न करता) राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मतिमद शाळा कळंब यांनी अपीलकर्त्यास माहिती त्वरित देणे आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) मुख्याध्यापक , मतिमद शाळा, कळंब यांनी उक्त आदेश प्राप्त झाल्यापासून आठ दिवसांत अपीलकर्त्यास भविष्य निर्वाह निधीची रक्कम वेतनातून कपात का होत नाही या संदर्भात त्यांनी केलेल्या तक्रारीवरील कार्यवाहीबाबतची माहिती द्यावी व त्याचा पूर्तता अहवाल दि. १५.०८.२००९ अखेर आयोगास सादर करावा. अन्यथा संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० अन्वये शास्ती व तदनुषंगिक अन्य कारवाईस पात्र राहतील.

पुणे
दि. ३०.०७.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम, १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री.आंबादास बाळासाहेब व-हाडे
मु. पो. ता. तुळजापूर, वेताळनगर,
जि. उस्मानाबाद

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
विस्तार अधिकारी (कृषि),
पंचायत समिती, बार्शी
जि. सोलापूर

**उत्तरवादी**

जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत गौडगाव,
ता. बार्शी, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४९७ / सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२३.१२.२००८ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१९.०१.२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२७.०१.२००९ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.०२.०३.२००९ |
| ६ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती<br>ग्रामपंचायत गौडगांव अंतर्गत झालेल्या विकासात्मक कामासंबंधी, यशवंत ग्राम समृध्दी योजना, १२ वा वित्त आयोग, जवाहर योजना अंतर्गत दलित वस्तीत झालेली सर्व कामे इ. बाबतची माहिती. | |

## विवेचन

अपीलकर्ते श्री. आंबादास बाळासाहेब व-हाडे यांनी गौडगाव ग्रामपंचायती तर्फे सन २००० ते २००८ या कालावधीत झालेल्या सर्व कामांचे एस्टीमेट, सी. सी. एम. बी., वर्क ऑर्डर तसेच वरील कालावधीत

एकूण किती कामे व कोणत्या फंडातून झाली त्यांची संपूर्ण यादी, सदर कामाचे सिमेंट कॉंक्रीट टेस्ट रिपोर्ट, पाहणी अहवालाच्या प्रती, व इतर एकूण १८ मुद्दयांची माहिती जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, गौडगांव यांच्याकडे मागितली होती.

जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक गौंडगाव यांनी सदर माहितीसाठीचे शुल्क म्हणून रू. ४३००/ चा भरणा करून माहिती घेऊन जाण्याबाबत अपीलकर्त्यास कळविले होते. त्यावर अपीलकर्ते श्री. व-हाडे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. अपीलकर्ते श्री. व-हाडे यांनी आपण दारिद्रय रेषेखाली असल्याचे नमूद केले आहे, त्याबाबतचा पुरावा सादर केल्यानंतर त्यांना माहिती देण्याची कार्यवाही करावी, असा निर्णय अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (कृषि) यांनी दिला. सदर निर्णयाविरुध्द अपीलकर्त्यांनी आयोगाकडे अपील केले आहे. या अपिलाच्या अनुषंगाने सर्व कागदपत्रांच्या छाननीअंती अपिलीय प्राधिकारी यांचा दि. ०२.०३.२००९ रोजीचा निर्णय योग्य असल्याचे दिसून येते.अपीलकर्त्याने मागितलेली माहिती आठ वर्षांच्या कालावधीतील व विस्तृत स्वरूपाची आहे. अपिलकर्त्यांनी आवश्यक तर सदर माहितीचे अवलोकन करावे व नेमकी माहिती ते दारिद्रयरेषेखाली असल्यास पुरावा देऊन नि:शुल्क व नसल्यास शुल्क भरून प्राप्त करून घ्यावी.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्ते श्री. अंबादास बाळासाहेब व-हाडे यांनी ते दारिद्रयरेषेखाली असल्याबाबतचा पुरावा सादर केल्यास त्यांना नि:शुल्क व ते दारिद्रयरेषेखाली नसल्यास आवश्यक शुल्क भरल्यानंतर माहिती देऊन त्याबाबतचा पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा,

पुणे
दि. ३०.०७.२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे :

| अ | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १५०१/ सोलापूर | श्री.मोहन खंडेराव गायकवाड ब्लॉक नं ११ ड, विसावा हौसिंग सोसायटी शहीद भगतसिंग मार्केट चौक, उत्तर सदर बझार, सोलापूर | सेक्रेटरी, विसावा सहकारी गृहनिर्माण संस्था.मर्या.सोलापूर, ब्लॉक नं ९, क, शहीद भगतसिंग मार्केट, उत्तर सदर बझार, सोलापूर | उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर शहर, सोलापूर | विसावा हौसिंग सोसा. या गृहनिर्माण संस्थेची आहे ऑगस्ट ०८ ते नोव्हे ०८ मधील मासिक सभा विषयाची व कार्यवृत्तांची नक्कल. | अपीलकर्त्याने अपिलासोबत शुल्क लावलेले नाही. |
| २ | १५०४/ सोलापूर | श्री.संजय जगन्नाथ बारबोले ४०६३, तुळजापूर रोड,बार्शी, जि. सोलापूर | माहिती अधिकारी, तालुका लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण कार्यालय बार्शी, जि. सोलापूर | अपिलीय प्राधिकारी, तालुका लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण कार्यालय, बार्शी, जि.सोलापूर | सन २००७ मध्ये तालुका लागवड अधिकारी कार्यालयाकडून सर्व हेड मधून योजनांमधून झालेल्या सर्व कामांचे मंजूर अंदाजपत्रक, तसेच रोजगार हमी योजनेचे हजेरीपत्रक छायाप्रत. | अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक ती कागदपत्रे सादर केली नाहीत. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | १५०५/ सोलापूर | श्री.संजय जगन्नाथ बारबोले ४०६३,तुळजापूर रोड,बार्शी, जि. सोलापूर | माहिती अधिकारी, शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी, जि.सोलापूर | अपिलीय प्राधिकारी, शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी जि. सोलापूर | कर्मवीर डॉ. जगदाळे मामा हॉस्पिटल मधील कामगारांचा सन १९९६ ते ९८ मध्ये कामगार कल्याण निधी भरला असल्यास सबंधित निधी निरीक्षकांचे शेरे अथवा अभिप्राय असलेल्या रजिस्टरची छायाप्रत,तसेच निधी भरला नसल्यास त्याबाबतची कारणे. | अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक ती कागदपत्रे सादर केली नाहीत. |
| ४ | १५०९/ सोलापूर | श्री.आनंद शशिकांत जोशी बी.८/२, पोस्टल कॉलणी, होटगी रोड, सोलापूर | उपशिक्षणाधिकारी (माध्य), जिल्हा परिषद, सोलापूर | शिक्षणाधिकारी (माध्य), जिल्हा परिषद, सोलापूर | शिक्षणाधिकारी कार्यालयात नोंद असलेल्या अतिरिक्त शिक्षकांची नावे, शैक्षणिक पात्रता, पूर्वीच्या शाळेचे नाव, अतिरिक्त होण्याचे कारण इत्यादी एकूण ७ मुद्यांची माहिती. | अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडलेली नाहीत. |
| ५ | १५१७/ सोलापूर | श्री.किसनराव पांडुरंग जाधव मु.देशमुखवाडी (शिंदेवाडी), पो.शिंदेवाडी, ता.माळशिरस, जि. सोलापूर | प्रशासकिय अधिकारी, प्रादेशिक मनोरुग्णालय, येरवडा, पुणे - ६ | अधीक्षक, प्रादेशिक मनोरुग्णालय, येरवडा पुणे - ६ | मनोरूग्ण श्री. प्रविण किसनराव जाधव यांचे बाबत दि. १८.०९.०७, ६.११.०८ व ७.१२.०७ रोजीच्या अर्जाप्रमाणे केलेल्या कार्यवाहीची माहिती. | अपीलकर्ते यांच्या मूळ अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दि.१७.११.०८ रोजी कळविलेल्या ... निर्णयानुसार शुल्क जमा करून माहिती उपलब्ध करून द्यावी, हा दि.२७.०१.२००९ रोजीचा अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय योग्य आहे. |
| ६ | १५२०/ सोलापूर | श्री.विनायक फकिरा विटकर १७/२, बुधवार पेठ, गुरूवर्य लक्ष्मण महाराजनगर, सोलापूर | कार्यालय अधीक्षक आ - ३ जमाबंदी आयुक्त कार्यालय, पुणे | उपसंचालक भूमि अभिलेख संलग्न जमाबंदी आयुक्त (भूमापन), पुणे | पुणे विभाग सर्व्हेअर/ क्लार्क कम टाईपिस्ट पदांसाठी निवड परीक्षा पध्दतीबाबत ची माहिती. | अपीलकर्त्याने अपिलासोबत विहित शुल्क जोडलेले नाही. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ७ | १४८८/ सोलापूर | श्री. ए. एम.शेख ब्लॉंक नं ३ अ, सिरतनगर, सोलापूर | सह. जिल्हा निबंधक सोलापूर | उप महानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, पुणे विभाग, पुणे | दि. ३१.०८.०७ रोजी निवृत्ती वेतन मिळविण्या-सबंधी केलेल्या अर्जाची छायाप्रत व त्यावर केलेली कारवाई, दि २९.१०.०७, ०१.०४.०७ रोजीच्या डी, सी, आर जी सबंधी तसेच दि १.४.०७ रोजीच्या तक्रारीची प्रत व त्यावर केलेल्या कारवाईची माहिती. | अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडलेली नाहीत. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

वरील तक्त्यातील अपिले अनुक्रमांक १ ते ७ (अपील क्र १५०१, १५०४, १५०५, १५०५, १५०९, १५१७, १५२० व १४८८/ सोलापूर) निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि. १.०७.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

प्रति

सचिव, सोनमाता समाजसेवा, संघ,
सोलापूर, १५ मेडिकल को- ऑप हौसिंग सोसा.
टिळक नगर, विजापूर रोड, सोलापूर **अपीलकर्ता**

**विरूध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा **उत्तरवादी**
आयुक्त,अपंग कल्याण,
०३,चर्च रोड,पुणे

जन माहिती अधिकारी तथा
अधीक्षक,
आयुक्त,अपंग कल्याण यांचे कार्यालय,
०३,चर्च रोड,पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५०८ / सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.०३.११.२००८ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. --- |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२१.०१.२००९ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.--- |
| ६ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :- राज्य मानवी हक्क आयोगाच्या आदेशाच्या अपंग व्यक्ति अधिनियम १९९५ (कलम ७३ आणि ७४) बाबतची माहिती. | |

## विवेचन

अपीलकर्ते सचिव, सोनमाता समाजसेवा संघ,सोलापूर यांनी न्यायाधीश, राज्य मानवी हक्क आयोग यांच्या दि. ६ सप्टेंबर २००८ रोजीच्या आदेशावर केलेली कार्यवाही, न्यायाधीश, राज्य मानवी हक्क आयोग यांच्या (दि. ४ ऑक्टोबर २००४ व ६ सप्टेंबर २००८) कोणत्या आदेशाची दखल

आयुक्त, अपंग कल्याण यांनी घ्यायची नसते, याबाबतचे शासन निर्णय,परिपत्रक, सूचना, नियम किंवा नियमावली मिळावी यासह इतर सात मुद्दयांची माहिती जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, आयुक्त, अपंग कल्याण यांचे कार्यालय, पुणे यांच्याकडे मागितली होती.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५, च्या कलम ६ (१) नुसार अपील व्यक्तीच्या नावे असणे आवश्यक आहे, पदनामाने नाही. तसेच भाष्य, अन्वयार्थ यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. माहितीची मागणी नेमकी असावी.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.१५ .०७.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**